# गुरूंचे शिष्यांना शिकवणे आणि गुरु-शिष्य संबंध

## अनुक्रमणिका

( काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे '*' या चिन्हाने दर्शवली आहेत. )


**१. शिष्याला ज्ञान देण्याच्या दृष्टीने गुरूंचे महत्त्व** १२

**२. गुरूंचे शिष्यांना शिकवणे** १२

* कविता, भजन आणि सुवचन यांतून शिकवणे १३

* प्रत्यक्ष शिकवणे १५

  * अव्यक्त भाव निर्माण होण्यासाठी सेवा परिपूर्ण करणे महत्त्वाचे १६

  * शिष्याची स्वतःवरील (गुरूंवरील) श्रद्धा अल्प पडली, याची त्याला जाणीव करून देणे २१

  * संतांकडे त्यांच्या कुटुंबियांनी कसे पहावे, हे शिकवणे २२

* विनोदातून शिकवणे २४

* वागण्यातून (अप्रत्यक्ष) शिकवणे २५

  * सतत सेवारत रहायचे, हे कृतीतून शिकवणे २६

* अनुभूतीतून शिकवणे २६

* स्वप्नातून शिकवणे २७

* शब्दातीत माध्यमातून (सूक्ष्मातून) शिकवणे २८

* स्थुलातून सूक्ष्माकडे नेणे ३०

* पंचतत्त्वात्मक स्वरूपात शिकवणे ३१

**३. गुरु-शिष्य संबंध** ३७

* शिष्याच्या मागील पुण्याईमुळे गुरु साधकाच्या जीवनात येणे ३७

* शिष्याची लौकिक दृष्टीने काळजी घेणे ३७

* शिष्याची आर्थिक स्थिती लक्षात घेणे ३९

* निष्काम शिष्यांची सकाम इच्छा पूर्ण करणे ४२

* गुरूंचा शिष्यांकडे पहाण्याचा दृष्टीकोन ४२

* शिष्यासाठी द्वैतात येणे ४५

* शिष्याच्या घरी जातांना घरच्यांची असुविधा (गैरसोय) होऊ न देणे ४६
* शिष्याचा सूक्ष्म 'मी'पणा घालवणे ४७
* शिष्याने स्वावलंबी बनण्यात आणि प्रगती करून पुढे जाण्यातच गुरूंना आनंद वाटणे ५०
* शिष्याला संतपदानंतरच्या पुढच्या प्रगतीविषयी मार्गदर्शन करणे ५०
* शिष्याचा रोग आणि मृत्यू ५३
  * रोग भोगण्याची शक्ती देणे ५३
  * मृत्यूपंथाला लागलेल्याला साधना सांगणे ५३
  * मृत्यूनंतरच्या योनीतून मुक्ती देणे ५५
* इतर गुरूंच्या शिष्यांशी वागणे ५५
* शिष्यांमुळे होणारी गुरूंची हानी आणि लाभ ५७

## मनोगत

'ज्ञानियांचा राजा गुरु महाराव', असे संत ज्ञानदेवांनी म्हटले आहे. ज्ञान देतात, ते गुरु ! शिळेपासून शिल्प बनू शकते; पण त्यासाठी शिल्पकार लागतो. त्याचप्रमाणे साधक आणि शिष्य ईश्वराला प्राप्त करू शकतात; पण त्यासाठी गुरूंची आवश्यकता असते. गुरूंनी आपल्या बोधामृताने साधक आणि शिष्य यांचे अज्ञान दूर केल्यावरच त्यांना ईश्वरप्राप्ती होते.

साधक आणि शिष्य यांनी साधना करतांना त्यांनी काय केले पाहिजे, काय त्यागले पाहिजे आदींची जाणीव गुरु करून देतात. केवळ उपदेशातूनच नव्हे, तर सर्वसाधारण वाटणाऱ्या वागण्या-बोलण्यातूनही गुरु बरंच काही शिकवतात. साधक आणि शिष्य यांना गुरूंच्या वागण्या-बोलण्याचा भावार्थ न कळल्यास ते गुरूंच्या अमूल्य विचारधनाला मुकतात. गुरूंच्या शिकवण्याच्या विविध पद्धती, उदा. विनोदातून शिकवणे, स्वप्नातून शिकवणे, अनुभूतीतून शिकवणे, परीक्षेतून शिकवणे प्रस्तुत ग्रंथात उदाहरणांसहित दिल्या आहेत. त्यामुळे गुरूंकडून वेगवेगळ्या अंगांनी कसे शिकायचे आणि त्यांचा खऱ्या अर्थाने कसा लाभ करून घ्यायचा, याची एक नवी दृष्टी विकसित व्हायला साहाय्य होईल.

आमचे गुरु प.पू. भक्तराज महाराज (बाबा) नेहमी म्हणायचे, ‘मी कोणाचा गुरु नाही; पण शिष्य केल्याविना सोडणार नाही !’ शिष्य म्हणजे ‘तत्त्वमसि’चा शिष्य, म्हणजे गुरुतत्त्वाचा शिष्य ! संकलकांपैकी डॉ. जयंत आठवले हेही स्वतःला ‘गुरु’ समजत नाहीत, तर ‘बाबांचा शिष्य’ या भावातच रहातात. असे असले तरी बाबांच्याच शिकवणीप्रमाणे साधकांना गुरुतत्त्वाचे शिष्य बनवण्यासाठी मात्र रात्रंदिवस प्रयत्नशील असतात. ‘सनातन संस्था’ आणि ‘हिंदु जनजागृती समिती’ यांचे साधक आणि कार्यकर्ते त्यांना ‘परात्पर गुरु’ या रूपात पहातात. यासाठीच डॉक्टरांनी साधकांना शिकवण्याविषयीची अनेक उदाहरणेही ग्रंथात दिली आहेत.

‘या ग्रंथाद्वारे जिज्ञासू, साधक आणि शिष्य यांना साधनेसाठी आवश्यक ज्ञान चांगल्या प्रकारे आत्मसात् करता येवो आणि त्यांचा प्रवास शीघ्रतेने ईश्वरप्राप्तीच्या दिशेने होवो’, अशी श्री गुरुचरणी प्रार्थना ! – **संकलक**